# SHRI SAMARTH COMPUTERS BARSHI

MS-CIT
World-class Comprehensive Computer Course

## Question Paper
## Set- II
**Std. – 10th MM/Semi**
**Subject – History H.L.**

MKCL KLiC Courses
Gateway to Knowledge Lit Careers

---

**Time : 2 Hrs.** **Marks : 40**

**प्र.१ अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.** ३

१) उत्तर भारतात __________ सादरीकरण मोठया प्रमाणावर केले जाते.

अ) हनुमानलीला ब) लोकनृत्य क) कीर्तन ड) रामलीला

२) चित्रकथी परंपरा कोकणातील कुडाळ जवळच्या पिंगुळी गावातल्या __________ या आदिवासी समाजाच्या लोकांनी जपली आहे.

अ) आगरी ब) कोळी क) ठाकर ड) भंडारी

३) __________या फ्रेंच विदुषीने स्त्रीवादाची मूलभूत भूमिका सिद्ध केली.

अ) सीमाँ-द-बोव्हो ब) व्हॉल्टेअर क) मायकेल फुको ड) कार्ल मार्क्स

**प्र.१ ब) पुढीलपैकी चुकीची जोडी लिहा.** ३

१)

| | **'अ' गट** | | **'ब' गट** |
|---|---|---|---|
| १) | न्या. म. गो. रानडे | अ) | द राईज ऑफ द मराठा पॉवर |
| २) | डॉ. बाबासाहेब आंबेडकर | ब) | हू वेअर द शूद्राज |
| ३) | ताराबाई शिंदे | क) | द हाय कास्ट हिंदू वुमन |
| ४) | भाऊसाहेबांची बखर | ड) | पानिपतच्या लढाईचे वर्णन |

२)

| | **'अ' गट** | | **'ब' गट** |
|---|---|---|---|
| १) | रेने देकार्त | अ) | फ्रेंच विचारवंत |
| २) | व्हॅल्टेअर | ब) | फ्रेंच तत्त्वज्ञ |
| ३) | सीमाँ-द-बोव्हा | क) | फ्रेंच विदुषी |
| ४) | मायकल फुको | ड) | इंग्रज इतिहासकार |

३)

| | **'अ' गट** | | **'ब' गट** |
|---|---|---|---|
| १) | दादासाहेब फाळके | अ) | राजा हरिश्चंद्र |
| २) | बाबूराव पेंटर | ब) | कल्याणचा खजिना |
| ३) | भालजी पेंढारकर | क) | बाजीराव मस्तानी |
| ४) | कमलाबाई मंगळूरकर | ड) | सावल्या तांडेल |

**प्र.२ अ) पुढील तक्ता पूर्ण करा. (कोणतेही दोन)** ४

१)




TAKALKAR

२)




३)




**प्र.२ ब) पुढील संकल्पना स्पष्ट करा. (कोणत्याही दोन)** ४

१) बाळ ज. पंडित

२) प्रसार माध्यमांची ओळख.

३) मराठी रंगभूमी.

**प्र.३ पुढील विधाने सकारण स्पष्ट करा. (कोणतेही दोन)** ४

१) आपण आपला नैसर्गिक व सांस्कृतिक वारसा जपला पाहिजे.

२) खेळांचा इतिहास हा माणसां ऐवढाच जुना आहे.

३) दूरदर्शन वरील भारत एक खोज ही मालिका सरस ठरली.

४) चित्रकथीसारख्या नामशेष होणाऱ्या मार्गावर असलेल्या परंपरेचे पुनरुज्जीवन करणे गरजेचे आहे.

**प्र.४ दिलेल्या उताऱ्याचे वाचन करुन त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे लिहा.** ४

उपयोजित इतिहास या संज्ञेसाठी " जनांसाठी इतिहास" (पब्लिक हिस्टरी) असा पर्यायी शब्दप्रयोग प्रचारात आहे. भूतकाळातील घटनांसंबंधीचे जे ज्ञान इतिहासाद्वारे प्राप्त होते, त्याचा उपयोग वर्तमान आणि भविष्यकाळात सर्व लोकांना कसा होईल याचा विचार उपयोजित इतिहास या विषयाद्वारे केला जातो. वर्तमानातील सामाजिक आव्हानांवर उपाययोजना करणे , सामाजिक उपयुक्तेचे निर्णय घेणे यांसारख्या गोष्टींसाठी पूर्वी होऊन गेलेल्या घटनांचे विश्लेषण दिशादर्शक ठरते. त्यासाठी इतिहासाचे ज्ञान आवश्यक असते. उपयोजित इतिहासाच्या क्षेत्रात केवळ तज्ज्ञ व्यक्तींचाच नव्हे तर सर्वसामान्य लोकांचा विविध अंगांनी सहभाग असू शकतो. संग्रहालये प्राचीन स्थळे यांना भेट देणारे पर्यटक या नात्याने त्यांचा सहभाग महत्त्वाचा असतो. पर्यटनामुळे लोकांमध्ये इतिहासासंबंधीची आवड वाढीस लागते. समाजमनामध्ये इतिहासाची जाणीव निर्माण होते. तसेच त्यांच्या स्वतःच्या शहरात किंवा गावात असणाऱ्या प्राचीन स्थळांच्या जतन आणि संवर्धनाच्या प्रकल्पामध्येही ते सहभागी होऊ शकतात.

१) उपयोजित इतिहास या संज्ञेसाठी कोणता पर्यायी शब्दप्रयोग प्रचारात आहे? १

२) उपयोजित इतिहासात कोणत्या गोष्टींचा विचार केला जातो? १

३) पर्यटनामुळे कोणत्या गोष्टी साध्य होतात? २

**प्र.५ पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** ६

१) स्त्रीवादी इतिहास लेखन म्हणजे काय?

२) बाळशास्त्री जांभेकर यांचा जन्मदिवस पत्रकार दिन म्हणून का साजरा केला जातो?

३) इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांचे इतिहास लेखनातील योगदान स्पष्ट करा.

TAKALKAR

४) आजच्या काळात कोश वाङ्मयाची आवश्यकता का आहे ?

## राज्यशास्त्र

**प्र.६ दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.** २

१) राज्यकारभारात महिलांचा सहभाग वाढावा म्हणून त्यांच्यासाठी ____________ ठेवण्यात आल्या.

(अ) राखीव जागा (ब) विशेष जागा (क) जिल्हा परिषदा (ड) ग्रामपंचायत

२) भारताचे जलपुरुष म्हणून _____________ यांना ओळखले जाते.

(अ) अमिर खान (ब) डॉ. राजेंद्रसिंह राणा (क) मकरंद अनासपुरे (ड) नाना पाटेकर

**प्र.७ पुढील विधाने चूक की बरोबर ते सकरण स्पष्ट करा. (कोणतेही दोन)** ४

१) निवडणुकीतील भ्रष्टाचारांमुळे लोकांचा लोकशाही प्रक्रियेवरचा विश्वास राहू शकतो.

२) निवडणूक प्रक्रियेत गोपनीयता असावी.

३) ‘शिरोमणी अकाली दल’ हा राष्ट्रीय पक्ष आहे.

**प्र.८ अ) पुढील संकल्पना स्पष्ट करा. (कोणत्याही एक)** २

१) राजकारणाचे गुन्हेगारीकरण

२) मताधिकार

**प्र.८ ब) पुढील संकल्पनाचित्रे पूर्ण करा. (कोणत्याही एक)** २

१)




२)




**प्र.९ पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही एक)** २

१) भारतातील शेतकरी चळवळीचे स्वरूप स्पष्ट करा.

२) सर्वांना निवाऱ्याचा हक्क मिळाला तर आपल्या देशातील लोकशाहीवर त्याचे कोणते परिणाम होतील असे तुम्हाला वाटते?

TAKALKAR